**४थे सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, माळशिरस यांचे न्यायालयात**

नियमीत दिवाणी दावा क्र २६१/२०१४

*दादासो उत्तम बाबर*

वि.

*हरीदास मारुती बाबर वगैरे*

**आदेश निशाणी क्रमांक ५७ खाली**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र ५ अनिल लक्ष्मण देशपांडे यांचे मृत्यू पश्चात त्यांचे कायदेशीर प्रतिनीधी अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफीचा अर्ज निशाणी क्र ५५ वर मंजूर झाल्याने त्यांच्या विरुध्द पारीत झालेले दावावसानाचे आदेश रद्द होऊन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे थोडक्यात कथन की, वादी यांनी सदरचा दावा हा हद्दीखुणा कायम होवून मिळणेसाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला असून प्रतिवादी क्र ५ हे दिनांक १९.०६.२०२३ रोजी मयत झालेले आहेत. वादीस प्रतिवादी क्र ५ यांच्या मृत्यु झाल्याची माहीती उशिरा मिळाल्याने मुदतीत अर्ज दाखल करता आले नाही. प्रतिवादी क्र ५ मयत झाल्यामुळे दावा त्यांच्याविरुध्द अवसानीत (Abate) झालेला आहे, त्यामुळे न्यायाचे दृष्टीने व तांत्रीक दृष्टीने सदरचे अबेटमेंट रद्द करण्यात होऊन मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. याउलट प्रतिवादी यांनी अर्जावर त्यांचे म्हणणे देवून हरकत नोंदवली. प्रतिवादी यांचे वकीलांनी युक्तीवादा दरम्यान अबेटमेंट रद्द करण्याची कारणे खोटी आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. दोन्ही बाजूंचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे निदर्शनास येते की, सदरचा अर्ज दाखल करण्यास विलंब झाल्याचे प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार निदर्शनास येते. प्रस्तुत प्रकरणी अबेटमेंट आदेश रद्द न केल्यास वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायाचे तत्वानुसार

अबेटमेंट आदेश रद्द करणेचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. परिणामी मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. निशाणी क्र ५७ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

MAHESH NARAYAN PATIL
Digitally signed by MAHESH NARAYAN PATIL
Date: 2023.11.01 17:12:17 +0530

(एम. एन. पाटील)

दिनांक ०१/११/२०२३

४थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,

माळशिरस

# C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| **Name of the Court** | **:** | 4th Jt. C.J.J.D & J.M.F.C., Malshiras. |
| **Name of Stenographer** | **:** | Praveen Nagnath Nalla (Grade III) |
| **Order signed by the Presiding Officer on** | **:** | 01 / 11 / 2023. |
| **Order uploaded on** | **:** | 01 / 11 / 2023. |